**CNR No. :- MHSI100002052018**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. २०/२०१८ :–

## –: निशाणी ३१ वरील आदेश :–

वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्यात व दावा नोंदवहीमध्ये दुरुस्ती होऊन मिळणेसाठी केला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, दावा प्रलंबीत असताना प्रतिवादी यांनी दि.१५.०१.२०१९ रोजी दावा विषयक अ.क्र. १ मिळकतीत वादीच्या हिश्श्यास असलेल्या क्षेत्रामध्ये अतिक्रमण करुन न्यायालयाचा नि.क्र. ५ वरील जैसे थे आदेश असताना आदेशाचा अवमान करुन संडासच्या टाकीच्या शेजारी संडासचे चिरेबंदी बेकायदा व अनधिकृत बांधकाम करुन त्यावर स्लॅब टाकून त्यावर सिंटेक्सची पाण्याची टाकी बसवली आहे, तसेच वादीने घातलेले तारेचे कुंपण तोडुन त्याऐवजी बेकायदेशीररीत्या लाकडी कुंपण केलेले असुन वादीस सदर मिळकतीत जावयाची वाट बंद केली. या अनुषंगाने वादी दाव्यामध्ये शिर्षकामध्ये, दावा परीच्छेद क्र. ७ खाली ७अ, परीच्छेद क्र. ९खाली ९ब, परीच्छेद क्र. १० मध्ये दाव्याच्या आकारात वाढीव मजकूर, परीच्छेद क्र. ११ विनंती सदरात फ व ग असे परीच्छेद व परीच्छेद क्र. ५ व ९ मध्ये वादीच्या बंधुचे वडीलांचे नाव या ठिकाणी दुरुस्ती करुन मागत आहे. वादीने पुढे असे अर्जात कथन केले आहे की, वादी मागत असलेली दुरुस्ती दाव्याचा न्यायोचित निर्णय होणेसाठी

आवश्यक असल्याने तशी परवानगी मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाकामी प्रतिवादी यांचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी यांनी नि.क्र. ३५ कडे अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास तीव्र आक्षेप नोंदविलेला आहे. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, सदर अर्ज हा वादीने प्रतिवादी यांना नाहक त्रास देण्याच्या हेतुने दाखल केला आहे, वादी; प्रतिवादी विरुद्ध शाबीत न होणारा खोटा आरोप करत आहे व त्याअनुषंगाने किरकोळ अर्ज दाखल करुन दाव्यास कारण निर्माण करुन कोर्टाची दिशाभुल करत आहे, दाव्यात आवश्यक पक्षकार सामील नाहीत, वादी खोडसाळपणे दाव्याचे स्वरुप बदलु पाहत असल्याने सदरचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. वादीच्या म्हणण्यानुसार जैसे थे आदेशाचा भंग करुन प्रतिवादी यांनी संडासच्या टाकीच्या शेजारी संडासचे चिरेबंदी बेकायदा व अनधिकृत बांधकाम करुन त्यावर स्लॅब टाकून त्यावर सिंटेक्सची पाण्याची टाकी बसवली आणि वादीने घातलेले तारेचे कुंपण बेकायदेशीरपणे तोडुन त्याठिकाणी लाकडी कुंपण करुन वादीस सदर मिळकतीत जाण्याची वाट बंद केली. या अनुषंगाने वादी दाव्यामध्ये शिर्षकात, दावा परीच्छेद क्र. ७ खाली ७अ, परीच्छेद क्र. ९खाली ९ब, परीच्छेद

क्र.१० मध्ये दाव्याच्या आकारात वाढीव मजकूर, परीच्छेद क्र. ११ विनंती सदरात फ व ग असे परीच्छेद व परीच्छेद क्र. ५ व ९ मध्ये वादीच्या बंधुचे वडीलांचे नाव या ठिकाणी दुरुस्ती करुन मागत आहे.

०६. दाव्याचे स्वरुप पाहता वादी मागत असलेली दुरुस्ती दावा गुणदोषावर निकाली करणेकरीता महत्वाची असल्याचे दिसून येते. तथाकथीत बांधकाम वादीच्या कथनाप्रमाणे दि.१५.०१.२०१९ रोजी झाले. परंतु, वादीने सदरची बाब ही बांधकाम पुर्ण झाल्यावर विलंबाने न्यायालयाच्या निदर्शनास आणलेली आहे. सदर विलंबाबाबत कोणतेही संयुक्तीक कारण अर्जात नमुद केलेले नाही. वादीच्या या कृत्यामुळे न्यायालयाचा व परीणामी प्रतिवादींचा अमुल्य वेळ वाया गेलेला आहे. परंतु, सदर कारणास्तव वादी दाव्यात मागत असल्याप्रमाणे दुरुस्ती नाकारणे हे नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन होणारे नाही. वादी मागत असलेल्या दुरुस्तीमुळे दावा विषयक मिळकतीमधील वस्तुस्थिती न्यायालयासमोर येऊन दावा परीणामकारकरीत्या निकाली करण्यास न्यायालयास मदतच होणार आहे. अर्ज नामंजूर केल्यास अर्जाच्या अनुषंगाने करावी लागणारी विविध कायदेशीर कामे चालविण्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी वादीने केलेल्या विलंबाचे खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन करणे मला उचित वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## –:: आदेश ::–

१. न्यायाचे कारणे रक्कम रु.५००/– (रुपये पाचशे मात्र) खर्चाचे आदेश करुन निशाणी ३१ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने सदर आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत कसुरीशिवाय सदर खर्चाची रक्कम रु.५००/– (रुपये पाचशे मात्र) प्रतिवादींना आदा करुन; अर्जातील मागणी प्रमाणे दाव्यात दुरुस्ती केल्यावर तशी दावा दुरुस्त प्रत हजर करावयाची आहे.

३. विहीत मुदतीत आदेशाची पुर्तता न केल्यास सदरचा आदेश स्वयंचलनाने (automatically) रद्द झाला असे समजण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by YASHODHAN PRADIP BAVKAR
Date: 2023.11.01 12:57:10 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – ०१.११.२०२३. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)

दोडामार्ग.